खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## द्वितीय वर्ष वाणिज्य

## सत्र ३

## विषय

## कंपनी कायद्याचे घटक–I

## प्रकरण ४

# कंपनीचे भांडवल

# प्रकरण ४
# कंपनीचे भांडवल

**प्रस्तावना :**

कंपनीचे भांडवल हे भागांमध्ये विभाजित झालेले असते. प्रत्येक भाग हा मालकी हक्काने निर्मित असतो आणि कंपनीचे भांडवल वाढवण्यासाठी त्याची विक्री करण्यासाठी देवू केलेला असतो. सर्वसाधारणपणे, भागांचे विभाजन हे सामान्य भाग आणि अग्रहक्क भाग या दोन प्रकारात केले जाते. भागभांडवल हा कंपनीच्या सामान्य भागांच्या भागधारकांच्या भाग व्यापारामधून मिळालेला असतो. भागभांडवल हे कंपनीच्या घटनापत्रात नमूद केलेले, सर्वसाधारण ध्येय प्राप्त करण्यासाठी तिच्या भागधारकांकडून संग्रहित केले गेलेले एकूण भांडवलाची रक्कम असते.

**भाग:**

भाग हे त्या व्यवसाय संस्थेच्या किंवा उद्योग संस्थेच्या वित्तीय मत्तेच्या मालकी हक्क व्याजाचे एकक आहे.कंपनीतील एखाद्या व्यक्तीचे कंपनीमध्ये असणारे भाग हे त्या व्यक्तीचे कंपनीमध्ये असणारे तिचे हितसंबंध दर्शवतात. भागांनी मर्यादित असलेल्या कंपनीच्या संदर्भात 'भाग' हा शब्द सामान्यतः कंपनीच्या भांडवलाचा लहानातलहान हिस्सा या अर्थाने वापरण्यात येतो. म्हणून कंपनीचे भांडवल ज्या अनेक लहान - लहान भागात विभागलेजाऊ शकते त्या सर्वांना 'भाग' असे म्हणतात.

व्याख्या :

१) भारतीय कंपनी कायदा १९५६ (कलम २(४६)):

**"भाग म्हणजे कंपनीच्या भांडवलातील अंश किंवा हिस्सा. भाग व स्टॉक यामधील फरक जेव्हा स्पष्ट किंवा गृहीत धरलेला नसतो, तेव्हा भाग या संज्ञेत स्टॉकचाही समावेश होतो."**

२) न्यायमूर्ती फेअरवेल :

**"भाग म्हणजे पैशाच्या स्वरूपात मोजला जाणारा सदस्यांच्या कंपनीशी असणारा हितसंबंध होय.'**

**भागांची वैशिष्ट्ये:**

१) भाग हा भांडवलाचा छोटासा घटक आहे.

२) भाग हे भागादाराकाचा कंपनीवरील मालकी हक्क दर्शवतात.

३) भागांना स्वतंत्र अनुक्रमांक असतो तो भाग दाखल्यावर नमूद केलेला असतो.

४) प्रत्येक भागाला विशिष्ट एक मूल्य असते.

५) नियमावलीतील नियमानुसार सार्वजनिक कंपनीचे भाग मुक्तपणे हस्तांतर करता येतात.

६) भाग हि भाग्धराकाची चल मालमत्ता आहे.

७) कंपनी समहक्क आणि अग्रहक्क अशा दोन भागात भागांची विक्री करते.

**भागांचे प्रकार :**

**१) सामान्य भाग :**

सामान्य भाग धारकाला लाभांशाचे वाटप, सर्वसाधारण सभेमध्ये मतदान यांचे संपूर्ण अधिकार दिलेले असतात. सामान्य भागधारकांना अग्रहक्क भागधारक आणि कर्जरोखे धारकांच्या देयानंतर लाभांश दिले जातात. हे भाग जोखीम भांडवल म्हणून देखील ओळखले जातात. कारण कोणताही नफा झाला असले तर त्यांना लाभांश मिळतो. अग्रहक्क भागांवरील लाभांशाच्या देयानंतर आणि कंपनी समापनाच्या वेळेस ते शिल्लक मत्तेतून देय असतात. अशा भागांवरील लाभांशांचा दर हा पूर्व निश्चित नसतो; तर कंपनी जो नफा मिळवेल त्यावरती अवलंबून असतो. कंपनीत मांडल्या जाणाऱ्या प्रत्येक ठरावावरती मत देण्याचा अधिकार सामान्य भागधारकांना आहे.

व्याख्या:

१९५६ च्या कंपनी अधिनियमाच्या कलम ८५(२) नुसार जे अग्रहक्क भाग नाहीत त्यांना सामान्य भाग असे म्हणले जाईल. दुसऱ्याच शब्दांत सामान्य भाग म्हणजे असे भाग की, ज्यांना पुढील अग्रक्रम हक्क नाहीत. अ) इतरांवरील दिले जाणारे अग्रक्रम. ब) कंपनी समापनाच्या वेळेस भांडवलाच्या पूनर्देयकाचे अग्रहक्क.

**सामान्य भागांची वैशिष्ट्ये :**

अ) कंपनीचे हे कायम स्वरूपाचे भांडवल असते. कंपनीच्या परिसमापनाच्या परिस्थितीत हेच भाग शेवटच्या दाव्यावरती परतावा स्वरूपात दिले जातात. याला कंपनीचे जोखीम भांडवल असे देखील म्हणता येईल.

ब) सामान्य भागधारकांना कंपनीकडून लाभांश मिळतात हे त्यांना गुंतवणूकीच्या परताव्या स्वरूपात मिळतात; लाभांशांचा दर कायमच अनिश्चित असतो आणि तो कंपनीच्या नफ्यावरती अवलंबून असतो आणि त्याचबरोबर तो कंपनीच्या धोरणावर देखील अवलंबून असतो.

क) कंपनीला होणाऱ्या अतिरिक्त नफ्यामध्ये समावेश करून घ्यायचा भागधारकाला अधिकार आहे तसेच ज्यावेळेस बाजारपेठेत कंपनी संबंधाने चलनवाढीची परिस्थिती असते त्यावेळेस सामान्य भागांचा समावेश अकल्पित नफ्यामध्ये केला जातो.

ड) ज्यावेळेस शेअर बाजारामध्ये योग्य परिस्थिती असेल, त्यावेळेस भागांच्या किंमती या वाढ झालेल्या असतात. अशा परिस्थितीत सामान्य भागधारक हे अतिरिक्त किंमतीपासून दूर जातात आणि गुंतवणूकीवरती अतिरिक्त परतावा मिळवतात.

इ) सामान्य भागधारकांना कंपनीचे सदस्य म्हणून पुढील अधिकार असतात.

१) सभेची सूचना प्राप्त करण्याचा आणि सभा उपस्थितीचा अधिकार असतो.

२) कंपनीचे विश्लेषण करून मत व्यक्त करण्याचा, टीकात्मक परीक्षण करण्याचा आणि मतदानाचा अधिकार त्याला असतो.

३) प्रतिपत्री पाठवण्याचा अधिकार असतो.

**२) अग्रहक्क भाग :**

अग्रहक्क भाग हे असे भाग आहेत की ज्यांना निश्चित अग्रक्रम अधिकार लाभांशाच्या देयकावरती असतात, तसेच भांडवल परतावाअग्रक्रम अधिकार असतात आणि त्याचवेळेस मतदानाच्या हक्कावरती काही निश्चित मर्यादा घालणारे असतात. सामान्य भागांप्रमाणे लाभांशाचे यात अनिश्चित स्वरूपाचे वितरण नसते तर अग्रहक्क भागधारकांना निश्चित दराने एकूण नफा जो होईल कंपनीला त्या स्वरूपात लाभांश मिळतो उपलब्ध होणारा कंपनीचा निव्वळ नफा हा विशिष्ट दराने अग्रहक्क भागधारकांना लाभांश रूपाने देयक म्हणून उपयोगात आणला जातो.

**अग्रहक्क भागांची वैशिष्ट्ये:**

१) भांडवल परतफेडीमध्ये अग्रक्रम असतो.

२) लाभांशासाठी अग्रक्रम असतो.

३) निश्चित दराने लाभांश मिळतो.

४) मतदानाचे सर्वसाधारण हक्क नसतात.

५) अग्रहक्क भागधारकांना बोनस भाग आणि हक्क भाग मिळत नाही.

६) सम हक्क भागापेक्षा यांचे मूल्य जास्त असते.

**अग्रहक्क भागांचे प्रकार :**

१) संकलित आणि असंकलित अग्रहक्क भाग-

जर कंपनीला नफा झाला नाही अथवा पुरेशा प्रमाणात नफा गोळा झाला नाही तर त्याचे लाभांश देय होत नाहीत. अशा परिस्थितीत लाभांशाची थकबाकी ही पुढे समाविष्ट केली जाते.ही थकबाकी ज्यावेळेस भविष्यकाळात कंपनीला नफा होईल त्यावेळेस दिली जाते.

जर अग्रहक्क भाग हे संकलित भाग नसतील तर त्यांच्या लाभांशाची थकबाकी ही पुढील काळात जमा केली जात नाही. आणि अशा प्रकारे भागधारकांचा जो लाभांश मिळण्याचा अधिकार असतो तो जोपर्यंत कंपनीला नफा होत नाही किंवा पुरेशा प्रमाणात नफा प्राप्त होत नाही तोपर्यंत स्थगित केला जातो.

२) परतफेडीचे आणि नपरतफेडीचे अग्रहक्क भाग-

प्रतिदेय अग्रहक्क भाग म्हणजे असे अग्रहक्क भाग असतात ज्याची परतफेड ठराविक वेळेनंतर करता येते.

न परतफेडीचे अग्रहक्क भाग म्हणजे या भागांच्या भांडवलाची परतफेड हि कंपनीच्या विसर्जन नंतरच करता येते.

३) समावेशित आणि असमावेशित अग्रहक्क भाग :

जर अग्रहक्क भाग हे समावेशित अग्रहक्क भाग असतील तर या प्रकाराच्या भागधारकांना निश्चित नफा सोडून अतिरिक्त नफ्यामध्ये सहभागी होण्याचा अधिकार असतो. आणि उरलेला वाटा सामान्य भागधारकांना लाभांशाच्या देयानंतर मिळतो.

जर अग्रहक्क भाग हे असमावेशित असतील तर भागधारकांना जो लाभांश मिळतो तो पूर्वनिश्चित दराने मिळतो आणि कंपनी समापनाच्या वेळेस त्यांना त्यांचे भाडवल परत मिळते. त्यांना कोणत्याही प्रकारे अतिरिक्त स्वरूपातील मोबदला मिळत नाही.

४) परिवर्तनीय आणि अपरिवर्तनीय अग्रहक्क भाग :

प्रचालनाच्या अटींनुसार अग्रहक्क भागधारकांना त्यांच्या भागांचे सामान्य भागांत परिवर्तन करण्याचा अधिकार हा निश्चित कालावधीनंतर आणि विहित अटींनुसार मिळतो अशा अग्रहक्क भागांना परिवर्तनीय अग्रहक्क भाग असे म्हणले जाते.

जे अग्रहक्क भाग हे परिवर्तनीय नसतात त्यांना अपरिवर्तनीय अग्रहक्क भाग असे म्हणले जाते.

## भाग भांडवल:

भागभांडवल हे कंपनीचे स्वतःचे भांडवल असते, हा पैसा भागधारकांचा असतो आणि भागधारक हे कंपनीचे मालक असतात. एकूण भागभांडवलाचे विभाजन हे छोट्या विभागांत केले जाते आणि प्रत्येक विभागाला भाग असे म्हणले जाते.जसजसा काळ बदलत जाईल तसतसे भागभांडवलाची रक्कम ही बदलत जाते कारण प्रत्येक वेळेस व्यवसायातून नवीन भागांची विक्री होत असते. भागभांडवलाची रचना ही सर्वसाधारण आणि अग्रक्रम भाग या दोहोंनी होत असते.

**भागभांडवलाचे प्रकार :**

१) अधिकृत भांडवल/Authorised Capital :

सर्वसामान्य लोकांना त्यांचे भाग विकून कंपनी जे जास्तीत-जास्त भांडवल संग्रहित करते किंवा वृद्धिगंत करते ती जास्तीत-जास्त रक्कम म्हणजे भागभांडवल असते. अधिकृत भांडवल हे सर्वसमावेशक भांडवल किंवा नोंदणीकृत भांडवल म्हणून ओळखले जाते. उदाहरणार्थ जर कंपनी १०० भागांची १० रू. याप्रमाणे विक्री करू इच्छित असेल तर कंपनीकडे संग्रहित होणारी एकूण रक्कम ही १०० x १० = १००० या प्रमाणे असेल. ज्या भागभांडवलाच्या सहाय्याने कंपनीची नोंदणी होते. याला अधिकृत भागभांडवल असे म्हणले जाते.

२) प्रचालित भांडवल/Issued capital :

हा अधिकृत भांडवलाचाच एक भाग आहे ज्याचे वास्तविक प्रचालन हे लोकांसाठी केले जात नाही. उदाहरणार्थ कंपनी रूपये १० याप्रमाणे ८० भागांचे निर्गमन करते त्यावेळेस प्रचालित भांडवलाची किंमत रक्कम स्वरूपात ८००/- रू. इतकी असते.

३) अप्रचलित भांडवल :

हा अधिकृत भांडवलाचाच एक भाग असून ज्याचे प्रचालन लोकांपर्यंत केले जात नाही. उदाहरणार्थ कंपनीने जर प्रत्येक रू. १०/- इतकी किंमत असणाऱ्या २० भागांचे प्रचालन केले नाही तर तिचे अर्थात कंपनीचे अप्रचालित भांडवल रू. २००/- इतके असेल.

४) अभिदत्त भांडवल/Subscribed capital :

हा प्रचालित भांडवलाचा एक भाग असून वास्तविकतः हे लोकांकडून अभिदत्त केले जातात. उदाहरणार्थ जर एखाद्या कंपनीने ८० भागांचे प्रचालन केले आणि त्यापैकी ७० भागांची खरेदी सर्वसामान्य लोकांकडून केली गेली तर रू. १०/- याप्रमाणे प्रत्येकी ७० भागांची किंमत ही ७००/- इतकी होते म्हणजेच रू. ७००/- हे त्या कंपनीचे अभिदत्त भांडवल असते.

५) विनाअभिदत्त भांडवल

हा प्रचालित भांडवलाचा एक प्रकार असून हे भांडवल लोकांकडून अभिदत्त होत नाही. उदा. कंपनीने एकूण ८० भागांचे निर्गमन केलेले असून, त्यापैकी ७० भाग लोकांकडून निर्गमित होतात किंवा अभिदत्त केले जातात व १० भाग लोकांकडून अभिदत्त होत नाहीत. या भांडवलाला विनाअभिदत्त भांडवल असे म्हणले जाते.

६) मागणी भांडवल/Called up capital :

अभिदत्त भांडवलाचा हा एक प्रकार असून वास्तविकतः याची मागणी कंपनीकडून केली जाते. उदाहरणार्थ, जर कंपनीने त्यांच्या भागधारकांना प्रत्येक ७० भागांमागे ५ रू. देय करण्यास

सागितले, तर त्यांना ७० भागाचे प्रत्येक भागाला ५/-रू. देय करावे लागतात, येथे या मागणी भांडवलाची एकूण रक्कम ७० x ५ = ३५० रू. अशी होते. याला मागणी भांडवल असे म्हटले जाते.

७) अमागणी भांडवल :

अभिदत्त भांडवलाचा हा एक प्रकार आहे याची मागणी कंपनी करत नाही. याला कंपनीच्या गरजेप्रमाणे उपलब्ध होणारा निधी असे सुद्धा म्हणले जाते. १० रू भागापैकी ५ रू. भाग कंपनीकडून मागणी केले जातात, २ रूपये भागांची मागणी होत नाही आणि ३ रू भाग हे राखीव ठेवले जातात.

८) राखीव भांडवल/Reserve capital :

राखीव भांडवल हे अमागणी भांडवलाचाच एक भाग आहे. याचा वापर केवल कंपनी समापनाच्या किंवा परिसमापनाच्या वेळेसच केला जातो. याला कंपनीच्या संपूर्ण जीवन काळासाठी भांडवल मात्र म्हणता येत नाही. याचा वापर केवळ कंपनी परिसमापनाच्या सारख्या असाधारण किंवा अतिविशिष्ट वेळेतच केला जातो. या भांडवलाचा हेतू पतदात्यांच्या गरजांची परिसमापनाच्या वेळेस पूर्तता करणे हा असतो.

९) देय भांडवल/paid up capital :

मागणी भांडवलाचाच हा एक प्रकार आहे. वास्तविकतः हे भागधारकांकडून देय केले जातात.

१०) अदेय भांडवल :

मागणी भांडवलाचाच हा एक प्रकार आहे ; जो भागधारकांकडून देय नसतो. उदाहरवार्थ एकूण ७० भागधारकांपैकी ६० भागधारकांनी त्यांच्या मागणी पैशाची देयता केली आणि १० भागधारकांनी मात्र त्याचे पैसे भरले नाहीत तर १०x५ = ५०/- रू. याला अदेय भांडवल म्हणावे लागते.

## रोखे अथवा प्रतिभूती :

रोखे किंवा प्रतिभूती ही वित्तीय किंवा गुंतवणुकीचे साधन असते ज्याची खरेदी किंवा विक्री ही वित्तीय बाजारामध्ये बंधपत्रे, कर्जरोखे, नोटा भाग आणि भाग अधिपत्र यांच्या स्वरूपात होत असते. कोणत्याही प्रकारची व्यापारी क्षमता असणारी मत्ता म्हणजे रोखे किंवा प्रतिभूती होय.

रोखे किंवा प्रतिभूतींचे प्रकार :

भारतीय कंपनी अधिनियम १९५६ नुसार कंपनी दोन प्रकारच्या रोख्यांचे प्रचालन करू शकते.

१) मालकी हक्क रोखे आणि

२) धनको रोखे, मालकी हक्क

**१) मालकी हक्क रोखे/प्रतिभूती :**

**i) सामान्य भाग:**

हे अशा प्रकारचे भाग असतात की ज्याद्वारे धारक हे अवशिष्ट हक्क सांगणारे असतात आणि कंपनीने उत्पन्न त्याच प्रमाणे भांडवलावरील अग्रहक्क नसतात. ते कंपनीच्या व्यवहारावरती नियंत्रण ठेवतात आणि तसेच मालकी हक्क जबाबदाऱ्याचे वहन त्या करतात. या भागांद्वारे कंपनीला जोखीम भांडवलाचा पुरवठा केला जातो.

**ii) अग्रहक्क भाग:**

कंपनी अधिनियमाच्या कलम ८५ (१) नुसार अग्रहक्क भाग म्हणजे असे भाग की जे लाभांश देयका संदर्भातील अग्रहक्क अधिकार निश्चित दराने पुढे नेतात. हे भागधारक दोन स्वरूपाच्या अग्रहक्क अधिकारांचा उपभोग घेतात. सगळ्यात पहिला हक्क म्हणजे त्यांना कंपनीला होणाऱ्या निव्वळ नफ्यापैकी निश्चित दराने लाभांश प्राप्त होतो. दुसरा अधिकार म्हणजे कंपनी परिसमापनाच्या वेळेस कर्ज देयकांनंतर शिल्लक मत्ता ही अग्रहक्क भागधारकांना परताव्याच्या स्वरूपात दिली जाते.

**२) धनको रोखे:**

**1) कर्ज रोखे:**

कर्जरोखे हे कंपनीने तिच्या नावावरती घेतलेल्या कर्जाची पोच असते. कंपनीने उभे केलेल्या ऋणाचा समान भाग म्हणजे कर्जरोखे असतात. हे कर्जरोखे लोकांना माहितीपत्रकाच्या माध्यमातून देऊ केले जातात. ते कायमच तरलता दराने किंवा स्थिर आकाराने प्राप्त केले जातात.

**ii) बंधपत्रे :**

बंधपत्रे ही बंधधारक आणि कंपनी या दोहोंमधील करार आहेत. बंध करारनाम्यामध्ये नियम व अटींचा समावेश केलेला असतो. कंपनीद्वारे नियुक्त केला गेलेला विश्वस्त बंधधारक मध्यस्थ म्हणून कृती करतो आणि कंपनीच्या व्यवहारांवरती नियंत्रण ठेवतो.

## भाग भांडवलाची उभारणीच्या पद्धती :

भांडवल उभारणीसाठी मुख्यत: दोन पद्धतीचा उपयोग केला जातो. पद्धती पुढीलप्रमाणे :

१) खासगी विपणन

२) सार्वजनिक विपणन

### १) खासगी विपणन

शेअर बाजाराचा आधार न घेता किंवा माध्यम म्हणून उपयोग न करता व्यक्ती अथवा संस्थांशी प्रतिभूती खरेदीविक्री व्यवहारासाठी थेट संपर्क प्रस्थापित केला जातो. खासगी कंपन्या साधारणपणे खासगी स्वरुपात खरेदी-विक्रीचा मार्ग पत्करतात. अपवादात्मक सार्वजनिक कंपन्या या मार्गाने आपल्या प्रतिभूतींची विक्री करतात. मित्र, नातेवाईक, संचालक, प्रवर्तक यांनाच कंपनीचे शेअर्स विकले जातात. याचा अर्थ प्रतिभूतींचे व्यवहार अंतर्गत स्वरुपात चालतात.

अ) खासगी विपणनाने मिळणारे फायदे :

१)खासगी विपणनामुळे भांडवल उभारणे सोपे जाते.

२)आवश्यक ते निधी गोळा केले जातील/निधी जमा होतील याची शाश्वती असते.

३)जाहिरात खर्चात पुष्कळशी बचत होते.

४)फार मोठ्या प्रमाणात कायद्याची बंधने पाळावी लागत नाहीत.

५)ही पद्धत वेळ आणि रक्कम दोन्ही संदर्भात लवचिक आहे.

६)भाग वाटप प्रक्रियेक्र सुलभपणे नियंत्रण ठेवता येते त्याचप्रमाणे गुंतवणूकदारांवर नियंत्रण ठेवता येते.

ब) खासगी विपणनाच्या मर्यादा :

१)विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे भाग वितरण जात नाही.

२)अशा प्रतिभूतींची बाजारपेठ मर्यादित असते. भागांचे व्यवहार शेअर बाजाराच्या मदतीने होत नाहीत.

३)मक्तेदारी निर्माण होणे शक्य असते. श्रीमंत आणि उच्चभ्रू अशा विशिष्ट कुटुंबियांकडेच कंपनीच्या भागांची मालकी असते.

### २) सार्वजनिक विपणन

खूपच मोठ्या प्रमाणावर भांडवल निर्मिती करावयाची असते त्यावेळी या मार्गाचा अवलंब केला जातो. त्याला 'पब्लिक ऑफर' असा शब्द आहे. सार्वजनिक 'मर्यादित' कंपन्या या पद्धतीचा अवलंब करतात. सार्वजनिक स्वरुपात भागांची विक्री करताना कंपनी कायदा, १९५६ अनुसार विविध तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असते.

अ) सार्वजनिक विपणनाचे फायदे :

१)भाग भांडवलाला विस्तृत प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होते.

२ खुल्या बाजारात भाग खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात त्यामुळे अशा प्रतिभूतींना अधिक रोखप्रदता प्राप्त होते.

३)खुल्या बाजारात भाग घेणे, व्यवहार करणे गुंतवणूकदारांना अधिक सुलभ ठरते.

ब) सार्वजनिक विपणनाचे मर्यादा किंवा उणिवा :

१)सार्वजनिक स्वरुपाच्या प्रतिभूतींचे विपणन खर्चिक ठरू शकते. भाग विक्रीला प्रतिसाद मिळावा यासाठी जाहिरात आणि प्रसिद्धीवर खर्च करावा लागतो.

२)कायद्याने आवश्यक अशा बऱ्याच गोष्टींची पूर्तता करावी लागते, भाग विक्रीकरिता खुले करण्यापूर्वी विविध अडसर पार करावे लागतात.

३) अशाश्वतता या घटकाला सामोरे जावे लागते. भाग बाजारात अनेक कंपन्यांचे भाग एकाच वेळी खुले असतात तेव्हा भाग विक्रीला किती प्रतिसाद मिळेल याचे नेमके अनुमान करता येत नाही.

## हक्क भाग वाटप

हक्क भाग, म्हणजे कंपनी सध्या अस्तित्वाचा असलेल्या भागधारकांना कंपनीचे अतिरिक्त भाग खरेदी करण्याचा हक्क प्रदान करते त्याला हक्क भाग असे म्हणतात. कंपनी भागधारकांना विशिष्ट क्रमांकाचे विशिष्ट किंमतीचे भाग कंपनी देवू करते. हे भाग खरेदी करण्यासाठी कंपनी भागधारकांना काही विशिष्ट वेळ प्रदान करते. साधारणपणे हे भाग कंपनी अस्तित्वात असलेल्या ग्राहकांना सवलतीच्या किंमतीमध्ये देऊ करते. जर अस्तित्वात असलेल्या ग्राहकांना कंपनीने समोर आणलेल्या प्रचालनाला योग्य प्रतिसाद दिला नाही तर कंपनी हे भाग सामान्य भाग म्हणून स्टॉक मार्केटमध्ये सामान्य भाग रूपात विक्रीस ठेवतात.

१) फायदे :

i) सार्वजनिक भाग प्रचालनापेक्षा हे स्वस्त आहे.

ii) हे संचालक मंडळाच्या निर्णयावर केले जाते. तिथे भागधारक किंवा स्टॉक एक्सचेंजचा विचार केला जात नाही.

iii) ही पद्धत क्वचितच अपयशी ठरते.

iv) सध्या अस्तिस्तात असलेल्या भागीदारांच्या भाग हिश्श्यात हे एकत्रित केले जात नाहीत. त्यांचे तरतूद ही त्यांचा हक्क म्हणून केली जाते.

२) मर्यादा :

i) अस्तित्त्वात असणारे भागधारक पुनर्गुंतवणुक करण्यासाठी किती प्रमाणात उत्सुक आहेत, यावरती या पद्धतीतून किती भांडवल वृद्धी होईल हे ठरत असते.

ii) जर भागधारकांनी त्यांचे हक्क घेतले नाहीत तर भागधारण हे एकत्रित केले जाते.

# बोनस भाग वाटप

जेव्हा कंपनीच्या सध्याच्या सदस्यांना अधिक पैसे न भरता अतिरिक्त भागाचे वाटप होते तेव्हा त्या भागांना 'बोनस भाग' असे म्हणतात. जेव्हा कंपनीच्या 'राखीव व अतिरिक्त नफा' खात्यात बरीच रक्कम जमा होते तेव्हा संचालक बोनस भाग जाहीर करतात.

**बोनस भाग वाटपासंबंधीची कार्यपद्धती :**

१) संचालकाची सही :

भांडवल नियंत्रकाची परवानगी घेतल्याशिवाय कंपनीने केलेल्या अर्जावर किमान एका संचालकाची सही असली तरच सेबीने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचे पालन केले जाते.

२) सभेत निर्णय :

संचालकांची सभा घेण्यासाठी अनेक कारणे असताना राखीव निधीतून किती रक्कमेचे बोनस द्यावे त्याचे प्रमाण किती असावे यांचा निर्णय मंडळाला सभेत दिला जातो.

३) भागधारकांची सभा :

संचालकांनी सभा घेऊन निर्णय घेतल्यास त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी भागधारकांच्या सभा आयोजित केल्या जातात व अंमलबजावणी केली जाते.

४) बोनस पत्र धारकांची यादी :

भागधारकांच्या सभेत ठराव संमत झाल्यावर चिटणीसाच्या कामांना सुरूवात होते. काही काळासाठी कंपनीचे हस्तांतर व नोंदणी पुस्तक बंद केले जाते त्या बोनसपत्र व्यक्तींची एक यादी करून त्याबद्दल सर्व माहिती लिखित स्वरूपात ठेवली जाते.

५) संचालक मंडळाची मान्यता :

बोनसपात्र सभासदांची यादी चिटणीस संचालक मंडळाला पाठवतो. त्याला संचालक मान्यता देतात व नंतरच चिटणीस प्रत्येक सभासदांना भागवाटप पत्र पाठवतो, त्यांना ते भाग नको असल्यास त्यांना काही कालावधी दिला जातो.

६) भाग वाटप पत्राचे वाटप :

वरील सर्व क्रिया झाल्यावर चिटणीस भागधारकांना भाग प्रमाणपत्रे तयार करून ती त्यांना नेण्यास विनंती करतो. भाग प्रमाणपत्रानंतर ३० दिवसाच्या आत बोनस भागवाटपाची माहिती व रक्कम नोंदणी अधिकाऱ्याला कळवितो.

**बोनस भाग वितरणाचे फायदे :**

१) भागधारकांसाठी फायदे :

१) गुंतवणुकीचे मूल्य वाढून भविष्यातील अधिक लाभ मिळतो.

२) बोनस भाग दिल्यामुळे कंपनीची आर्थिक स्थिति स्थिर व मजबूत असल्याचे व भविष्यात जास्त नफा असल्याचे सूचित होते. त्यामुळे भागधारकाच्या गुंतवणुकीचे भांडवली मूल्य वाढते.

२) कंपनीसाठी फायदे :

i) चांगली नाव :

बोनस भाग देणाऱ्या कंपन्यांचे नाव व पत चांगली राहते.

ii) शेअर बाजारात चांगला भाव :

शेअर बाजारात कंपनीच्या भागांना बोनस जाहीर झाल्यानंतर अधिक किंमत येते.

iii) भविष्यात भांडवल जोडणे सुलभ होते :

बोनस भाग देणाऱ्या कंपनीला नाव, स्थैर्य व किफायतशीरपणा प्राप्त होतो. भविष्यात कधीही भांडवल जोडायचे असेल तर कंपनीला ते सोपे जाते.

**कर्मचारी उत्तेजनार्थ समभाग पर्याय योजना (ESOS):**

कर्मचाऱ्यांना उत्तेजनार्थ समभाग देण्याच्या योजनेसाठी सध्या जे काही नियम आहेत त्यांच्या पुनरावलोकनासाठी आय. आय. एम. अहमदाबाद येथील प्रा. जे. आर. वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली सेबीने एक समिती नेमली आहे. समितीचे सदस्य सेबीचेही सदस्य आहेत. याला कर्मचारी समभाग खरेदी योजना (Employee Stock Purchase Plan [ESPP]) असे म्हणतात. या ESOS व ESPP योजना १९-३-९९ पासून खालीलप्रमाणे अंमलात येतील असे सेबीने कळवले आहे.

१) कर्मचारी मोबदला म्हणून सहभाग :

बाजारभावापेक्षा जास्त सवलत देऊन कर्मचाऱ्यांना समभागांचा पर्याय दिला तर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या मोबदल्याचीच ती एक पद्धत धरली जाईल आणि या पर्यायासाठी समभागाच्या किमतीवर कितीही सवलत दिली तरी कंपनीच्या अर्थविषयक अहवालात मात्र, कर्मचाऱ्यांच्या अतिरिक्त वेतनाचाच भाग म्हणून हे समभाग धरले जावेत.

२) अर्थविषयक अहवालात नोंद :

अशा प्रकारे जर संस्थेच्या अर्थविषयक बाबीची संस्थेच्या अर्थविषयक अहवालात नोंद झाली असेल, तर कर्मचारी उत्तेजनार्थ समभाग पर्याय योजना ही सेबीने पसंती दाखवून या योजनेत केलेल्या समभाग वितरणासाठी विक्री किमतीचे जे नियम केले आहे. त्या नियमामंध्ये त्या अहवालाचा समावेश केला जात नाही.

३) प्रस्ताव व मंजुरी :

संस्थेच्या समभाग धारकांनी खास प्रस्ताव करून अशा उत्तेजनार्थ समभागांच्या वितरणास मंजुरी देणे आवश्यक आहे.

४) भागांची संख्या :

कुठल्याही एका कर्मचाऱ्याला जास्तीत जास्त किती समभाग देण्यात यावेत यावर कुठलेही बंधन नाही; परंतु जर काही कर्मचाऱ्यांना १ टक्क्यापेक्षा जास्त समभाग दिले तर सर्वसाधारण वार्षिक सभेमध्ये त्यासाठी विशेष प्रकटीकरण आणि मंजुरीची आवश्यकता असते.

५) घोषणा व वितरण यामधील कालावधी :

अशा प्रकारचे समभाग देण्याची घोषणा आणि प्रत्यक्ष वितरण यामध्ये जास्तीतजास्त एक वर्षाची मुदत देण्यात आली आहे. एका वर्षानंतर मात्र, हा पर्याय कधी प्रत्यक्षात उतरवता येईल याचा कालावधी कंपनीने निश्चित करायचा आहे.

६) अंमलबजावणी :

ESOS या योजनेची अंमलबजावणी संचालक मंडळाच्या नुकसान भरपाई समितीच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली होईल. या समितीमध्ये मोठ्या प्रमाणात स्वतंत्र संचालकांच्या समावेश करण्यात यावा.

७) योजना लागू होण्यासंबंधी :

ESOS ही योजना कंपनीच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना आणि संचालकांनाही लागू होईल; परंतु भागधारक आणि कंपनीचे प्रवर्तक यांना लागू होणार नाही. भागधारकांची खास अनुमती घेऊन ही योजना संस्थेच्या दुय्यम कंपनीला किंवा मालकीधारक कंपनीला लागू होऊ शकते.

## प्रस्वेदन समहक्क भाग/स्वेट इक्विटी शेअर्स :

स्वेट समहक्क भाग अलीकडील काळात प्रचारात आलेली संकल्पना आहे. ही संकल्पना कंपनीदुरूस्ती कायदा १९९९ मधील कलम ७९ (अ) मध्ये सादर करण्यात आली आहे.

कंपनी रोख रकमेशिवाय आपल्या कर्मचारी, संचालकांना तसेच विविध प्रकारच्या तज्ज्ञ व्यक्ती किंवा संस्थांना सूट देऊन समहक्क भागांची विक्री करीत असेल, तर अशा समहक्क भागांना स्वेट समहक्क भाग असे म्हणतात.

ब) व्याख्या :

"स्वेट समहक्क भाग म्हणजे कंपनीचे कर्मचारी आणि संचालकांना सूट देऊन ज्या समहक्क भागांची कंपनीने विक्री केलेली आहे किंवा रोख रकमेशिवाय इतर मोबदल्यात तांत्रिक सल्ला देणाऱ्या व बौद्धिक मालमत्तेवर अधिकार असणाऱ्या व्यक्तींना जे समहक्क भाग देण्यात आलेले आहेत, अशा भागांना स्वेट समहक्क भाग असे म्हणतात."

**स्वेट समहक्क भागविक्रीच्या अटी**

१) कंपनीच्या सर्वसाधारण वार्षिक सभेत स्वेट समहक्क भागविक्रीबाबतचा ठराव संमत झाला पाहिजे.

२) संमत केलेल्या ठरावात भागांचा प्रकार, संख्या, किंमत इत्यादी माहिती तसेच ज्या कर्मचाऱ्यांना व संचालकांना भागविक्री करावयाची आहे त्यांची माहिती असली पाहिजे.

३) कंपनीने व्यवसाय सुरू केल्यानंतर १ वर्षाने अशा भागांची विक्री केली पाहिजे.

४) सेबीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व नियमानुसार अशा भागांची विक्री केली पाहिजे.

५) जे समभाग प्रचलित करायचे आहे त्यातील काही समभाग ही अगोदरच प्रचलित केला गेला आहे.

## भागांची पुनखरेदी :

भागांची पुनखरेदी म्हणजे कंपनीने एकदा विकलेल्या भागांची पुन्हा स्वतःच खरेदी करणे होय. काही विशिष्ट परिस्थितीत भारतीय कंपनी कायद्याच्या कलम ७७ अ नुसार भागांनी मर्यादित असलेली सार्वजनिक कंपनी एकदा विकलेल्या भागांची स्वतःच पुनखरेदी करू शकते. कंपनीला जेव्हा आपल्या भागभांडवलात कपात करावयाची असते, तेव्हा कंपनी कायद्याच्या कलम १०० ते १०४ मधील तरतुदीनुसार कंपनीला भागांची पुनर्खरेदी करता येते.

**कायदेशीर तरतुदी :**

१)भाग पुनखरेदी निधी :

कंपनीचा मुक्त राखीव निधी, रोखे वाढावा खाते व सद्यःस्थितीत केलेल्या भागविक्रीतून मिळालेली रक्कम इत्यादी प्रकारे जमा झालेल्या रकमेतून भागांची पुनखरेदी कंपनीने केली पाहिजे.

२)भाग पुनखरेदी नियम :

i) कंपनीच्या नियमावलीत तरतूद असली पाहिजे.

ii) कंपनी सभासदांनी आपल्या सभेत विशेष ठराव संमत केला पाहिजे.

iii) कंपनीचे वसूल भागभांडवल व मुक्त राखीव निधीच्या २५% पेक्षा जास्त रकमेच्या भागांची पुनर्खरेदी कंपनीने करू नये.

iv) भागांच्या पुनखरेदीमुळे कंपनीचे कर्ज हे भागभांडवल व मुक्त राखीव निधीच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक असू नये.

v) कंपनीने पूर्ण रक्कम वसूल झालेल्या भागांचीच पुनखरेदी केली पाहिजे.

vi) कंपनीने सेबीच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे भागांची पुनखरेदी केली पाहिजे.

३) सभेची सूचना देणे :

कंपनीने भागांच्या पुनखरेदीस सभासदांची मान्यता घेण्यासाठी त्यांची सभा आयोजित केली पाहिजे, त्यासाठी कंपनीने सभासदांना सभेची सूचना दिली पाहिजे.

४) आर्थिक क्षमतेचे निवेदन देणे :

संचालक मंडळाने या निवेदनापासून किमान एक वर्षाच्या आत कंपनी दिवाळखोर होणार नाही व कंपनी आपली सर्व देणी भागवू शकेल, याची आपण खात्री केली आहे असे निवेदनात नमूद केले पाहिजे

५) भाग नष्ट करणे:

कंपनीने पुनखरेदी केलेले भाग सात दिवसांच्या आत नष्ट केले पाहिजेत.

६) भाग विक्री करणे:

कंपनीने भागांच्या पुनर्खरेदीनंतर त्याच भागांची पुन्हा किमान दोन वर्षे विक्री करता कामा नये.

**७) भागांची नोंदवही ठेवणे :**

कंपनीने पुनर्खरेदी केलेल्या भागांची माहिती एक स्वतंत्र नोंदवहीत लिहून ठेवली पाहिजे. यामध्ये पुनखरेदीचा मोबदला, दिनांक व इतर तपशील असला पाहिजे.

**८) माहिती सादर करणे :**

कंपनीने भागांच्या पुनर्खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यासंबंधीचे तपशीलपत्रक ३० दिवसांच्या आत सेबीकडे व नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजे

**९) शिक्षा व दंड :**

भागांच्या पुनखरेदीबाबत दिलेल्या तरतुदींचे पालन न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यास २ वर्षे कैद किंवा ५०००० रु. दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**१०) भांडवल परतफेड निधी निर्माण करणे :**

कंपनी जेव्हा आपल्या मुक्त राखीव निधीतून भागांची पुनखरेदी करते, तेव्हा तितकीच रक्कम कंपनीने भांडवल परतफेड राखीव निधीला (Capital Redemption Reserve) वर्ग केली पाहिजे व त्याचा उल्लेख ताळेबंदात केला पाहिजे.

**११) प्रतिबंध :**

i) कलम १५९ प्रमाणे कंपनीने जर वार्षिक तपशीलपत्रके तयार केली नसतील व नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर केली नसतील तर

ii) कलम २०७ प्रमाणे – कंपनीने जर जाहीर केलेला लाभांश वाटण्यात चूक केली असेल

iii) कलम २११ प्रमाणे - कंपनीने जर वार्षिक हिशोबपत्रके तयार केलेली नसतील तर

## कंपनी भागांचे वाटप :

'भागांचे वाटप' म्हणजे कंपनीच्या एकूण भांडवलाचे विशिष्ट संस्थेमध्ये विभाजन करणे व ठरावीक मूल्याच्या विशिष्ट वर्गाच्या भागांचे विविध व्यक्तींना/संस्थांना वाटप करणे. भागवाटपामुळे कंपनी व भागधारक यात एक प्रकारचा करार प्रस्थापित होतो. जेव्हा वाटप झाल्याची अधिकृत नोंद होते तेव्हा भागधारक कंपनीचा सदस्य होतो.

**भागवाटपाविषयीच्या कायदेशीर तरतुदी/कार्यपद्धती :**

१) माहितीपुस्तिका निबंधकाकडे सादर करणे :

भागवाटपाविषयीच्या माहितीपुस्तिकेची एक प्रत कंपनी निबंधकाकडे सादर करणे आवश्यक असते.

२) अर्जाबरोबर भरावयाची रक्कम :

कलम ६९(३) नुसार भागांच्या निर्धारित मूल्याच्या कमीतकमी ५ टक्के तरी रक्कम भागवाटपाच्या अर्जाबरोबर जोडणे आवश्यक आहे. भागाची प्रथम केलेली विक्री व नंतर केलेली विक्री या सर्वांसाठी ही अट लागू होते.

३)किमान भागासाठीचे पुरेसे अर्ज :

भागवाटपासाठी निर्धारित केलेल्या किमान भागासाठी पुरेसे अर्ज आले नाहीत तर सर्व अर्जदारांनी अर्जासोबत भरलेली रक्कम १२९ दिवसांच्या आत परत करावी लागते.

४) वर्गीकृत बँकेत जमा करावयाचे बंधन :

कलम ६९(४) नुसार भागवाटपानंतर अर्जाबरोबर गोळा झालेली रक्कम कंपनीला वर्गीकृत बँकेमध्ये जमा करावी लागते.अर्जदारांना सुरक्षितता प्राप्त व्हावी हा यामागील उद्देश आहे.

५) भाग वाटपाची सुरुवात :

भाग वाटपाची पुस्तिका वितरित केल्यानंतर कमीतकमी ५ दिवसानंतरच कंपनीला अधिकृतपणे भागांची विक्री करता येते. इच्छुक अर्जदारांना अर्ज भरण्यापूर्वी विचार करण्यास पुरेसा वेळ मिळावा म्हणून ही अट ठेवण्यात आली आहे.

६) भाग वाटपांची पूर्तता:

माहितीपुस्तिकेचे वितरण झाल्यानंतर १२० दिवसांच्या आत भाग वाटपाची प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असते नाहीतर अर्जदारांना पुढील १० दिवसात भाग वाटपासाठी भरलेली रक्कम परत करावी लागते. कलम ६९(५) नुसार, जर १३० दिवसात अशी रक्कम परत केली नाही तर कंपनीच्या संचालकांना १३१ व्या दिवसानंतर द.सा.द.शे. ६% व्याजासह ही रक्कम परत करावी लागते.

७) शेअर बाजाराची अनुमाने (कलम ७३) :

जर एकाहून अधिक शेअर बाजारात भागांचे व्यवहार होणे अपेक्षित असेल तर माहितीपुस्तिकेत त्या त्या शेअर बाजाराचे नाव निर्दिष्ट करणे आवश्यक आहे

८) दंड किंवा इतर कारवाई :

भाग वाटपाची पुस्तिका व माहिती वेळेवर सादर केली नाही तर भाग वाटप रद्द न होता कंपनीस ५,००० रु. पर्यंत दंड होऊ शकतो.

९) भाग वाटप रद्द होणे :

कलम ७३(१) नुसार शेअर बाजारामध्ये खरेदी/विक्रीवरील निर्बंध जर पाळले गेले नाहीत तर भागवाटप रद्द ठरू शकते.

१०) कमीतकमी अटी :

अ) एकूण भागांच्या निर्धारित मूल्यापैकी ५% तरी रक्कम आधी रोख म्हणून स्वीकारली गेली पाहिजे.

ब) माहितीपुस्तिकेत दिलेल्या कमीतकमी भागांसाठी अर्ज आलेले असावेत.

क) अर्जाबरोबर आलेली रक्कम वर्गीकृत बँकेत जमा करणे आवश्यक आहे.

## अनियमित भाग वाटप :

अ) अर्थ :

कंपनी कायद्यातील कलम ६९ आणि ७० मध्ये किमान अभिदान, आवेदन रक्कम आणि माहितीपत्रिकाऐवजीचे निवेदन या संदर्भातील तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदी सर्वसामान्य जनतेला भाग वाटप करण्याशी संबंधित आहेत. या तरतुदी विचारात न घेता कंपनीने जर भाग वाटप केले तर त्यास अनियमित भाग वाटप असे संबोधले जाते. भागवाटपाबाबत कायद्याने घातलेल्या अटी किंवा मर्यादा न पाळता केलेल्या भागवाटपाला अनियमित भागवाटप असे म्हणतात.

ब) भाग वाटप केव्हा अनियमित होते ? :

१) जर भागाच्या निर्देशित मूल्याच्या कमीतकमी ५% रक्कम आवेदन रक्कम म्हणून प्राप्त न केल्यास.

२) माहितीपत्रक जारी केल्यापासून १२० दिवसांच्या आत किमान अभिदान रक्कम न मिळाल्यास.

३) जर आवेदन रक्कम कोणत्याही अनुसूचित बँकेतील स्वतंत्र खात्यात जमा न केल्यास.

४) भांडवल उभारणीसाठी जनतेला आवाहन न करणाऱ्या कंपनीने त्यांच्या प्रथम भागवाटपाच्या ३ दिवस अगोदर माहितीपत्रकाऐवजीचे निवेदन न दिल्यास.

## भागांवरील रकमेची मागणी :

कंपनीची संपूर्ण काळासाठी प्रत्येक भागावर शिल्लक रक्कमेचा एक भाग किंवा संपूर्ण परत फेडीसाठी त्याच्या भागधारकाकडे कंपनीद्वारे केली गेलेली मागणी होय. अशा प्रकारे भागावरील रक्कम मागणीची संकल्पना मांडलेली आहे. काही वेळा भागावरील रक्कम देण्याबाबत कंपनीची नियमावली सभासदांना हप्ते ठरवून देते. हे हप्ते ठरावीक रकमेचे असतात व ते ठरावीक मुदतीत भरावयाचे असतात. त्याचा सविस्तर तपशील माहितीपत्रकात व नियमावलीत दिलेला असतो.

**भागावरील वैध मागणीसाठी पूर्वावश्यक बाबी :**

१) निर्णय व ठराव :

कंपनी कायद्याच्या कलम २९२ प्रमाणे भागावरील रकमेची मागणी करण्याचा अधिकार संचालक मंडळास असतो, तेव्हा संचालकांनी त्यासबंधी निर्णय घेऊन सभेत ठराव संमत केला पाहिजे व त्याचवेळी त्या ठरावात मागणीची मुदत, रक्कम, रक्कम भरण्याची अंतिम तारीख, स्थळ, बँकेचे नाव इत्यादी स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.

२) मागणीची रक्कम :

मागणीच्या विशिष्ट किमतीविषयी ठराव पास केला जाऊ शकतो. भागावरील मागणीची रक्कम भागाच्या दर्शनी किमतीच्या २५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी असावी.

३) मागणीचा कालावधी (मागणीची मुदत):

एकाच प्रकारच्या भागावर करण्यात येणाऱ्या कोणत्याही दोन मागण्यांमध्ये किमान एक (१) महिन्याचे अंतर असावे.

४) मागणीचा योग्य वापर :

भागावरील मागणी केलेली रक्कम ही कंपनीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी व आर्थिक गरजा भागविण्यासाठी केली पाहिजे. संचालकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी ही रक्कम मागविली नसली पाहिजे.

५) समान रक्कम - मुदत :

कंपनी कायद्याच्या कलम ९१ प्रमाणे एकाच प्रकारच्या भागावरील केलेल्या मागणीची रक्कम समान असली पाहिजे व ती भरण्याची मुदतही सारखीच असली पाहिजे.

६) मागणीची सूचना:

कंपनीने भागावरील रकमेची मागणी करणारी १४ दिवसांच्या मुदतीची सूचना भागधारकांना दिली पाहिजे व त्यांना संचालक मंडळाचा ठराव व निर्णय कळविला पाहिजे.

७) मागणी स्थगित किंवा रद्द करणे :

भागावरील रकमेची मागणी संचालक मंडळ रद्द किंवा काही काळापर्यंत तहकूब करू शकते.

८) व्याज:

भागावरील रक्कम दिलेल्या मुदतीत भागधारकाने भरली नाही, तर त्या रकमेवर ५ टक्के दराने कंपनी व्याज घेऊ शकते व कलम-९२-प्रमाणे जर एखाद्या भागधारकाने आगाऊ रक्कम भरली, तर अशा व्यक्तीस ६ टक्के दराने कंपनी व्याज देते.

९) मतदान हक्क :

भागावरील मागितलेली रक्कम भरल्याशिवाय सभासदांना मतदानाचे हक्क मिळत नाहीत.

१०) भागभांडवलाचे हस्तांतरण :

भागावरील मागितलेली रक्कम भरल्याशिवाय सभासदाला भागांचे हस्तांतर करता येत नाही. भागावरील मागविलेली रक्कम भाग विकणाऱ्याने किंवा विकत घेणाऱ्याने भरली पाहिजे, तरच भागांचे हस्तांतर होऊ शकते.

**भाग रकमेची आगाऊ मागणी:**

आगाऊ मागणीशी संबंधित तरतुदी :

१) कंपनी जर तिच्या कलमांनी अधिकृत केले असेल तर अदेय स्वरूपात असणाऱ्या भागाची रक्कम कोणत्याही संबंधित सदस्याकडून स्वीकारू शकते.

२) कंपनी अशा आगाऊ मागणींवरती जी मागणी वास्तवात देय आहे किंवा देय होऊ शकते त्यावर काही वेळेस व्याज देऊ शकते.

३) ज्या वेळेस कोणत्याही सदस्याकडून कंपनीला आगाऊ मागणी वित्त प्राप्त होते. अशा सदस्याला देय व्याजदराच्या संदर्भाने धनको असे संबोधले जाते.

४) कंपनी समापनाच्या वेळेस, भागधारकांची श्रेणी ही या धनकोनंतर असली तरी व्याजासहित ती रक्कम परत करावी लागते

## भाग प्रमाणपत्र/दाखला :

भाग दाखला हा भागांच्या नावे कंपनीच्या सामाईक चिन्ह/मुद्रे अंतर्गत एक किंवा अधिक संचालकांची स्वाक्षरी असलेले आणि कंपनी चिटणीसाने स्वाक्षांकित केलेला घटनापत्राच्या कलमानुसार प्रचलित किंवा निर्गमित केला गेलेला भागांच्या नोंदणीचा पुरावा म्हणजे भाग दाखला असतो. "भाग प्रमाणपत्र हे भागधारकांच्या भागावरील मालकी व अधिकारांचा प्रथमदर्शनी पुरावा दर्शविणारे पत्रक होय." “भाग प्रमाणपत्र म्हणजे कंपनीने आपल्या शिक्कामोर्तबासाठी दिलेल्या भागांच्या मालकी हक्काचे पत्रक होय."

थोडक्यात, भाग प्रमाणपत्र म्हणजे कंपनीने भागधारकांना त्यांनी घेतलेल्या भागाबद्दल दिलेले प्रमाणपत्र किंवा दाखला होय.

"भाग प्रमाणपत्र म्हणजे कंपनीने आपल्या सही-शिक्क्याखाली दिलेल्या भागाच्या मालकी हक्काचे पत्रक होय.

## भाग प्रमाणपत्र देण्यासंबंधीच्या तरतुदी :

**१) निःशुल्क :**

कंपनीने भागांचे वाटप केल्यानंतर प्रत्येक भागधारकाला त्याने खरेदी केलेल्या सर्व भागासाठी किमान एक भाग प्रमाणपत्र निःशुल्क मिळविण्याचा अधिकार आहे.

**२) ठराव :**

भाग प्रमाणपत्रे भागधारकांना देण्यापूर्वी संचालक मंडळाच्या सभेत एक ठराव पास करूनच देण्यात यावी. त्यापूर्वी भाग वाटपपत्र किंवा खराब झालेले प्रमाणपत्र परत घेतले पाहिजे.

**३) अतिरिक्त भाग प्रमाणपत्र :**

भागधारकाने सुरवातीला भाग प्रमाणपत्र मिळविल्यानंतर त्याला एक किंवा जास्त भागांसाठी अतिरिक्त प्रमाणपत्र प्राप्त करता येईल. मात्र, यासाठी भागधारकाला ठरविलेली शुल्क फी भरावी लागेल.

**४) भाग निर्गमन :**

भागाची मालकी एकापेक्षा जास्त व्यक्तीकडे तर भागप्रमाण निर्गमित केले जाते.

**५) संचालक / चिटणीस सही :**

प्रत्येक भाग प्रमाणपत्रावर किमान दोन संचालकांची किंवा कंपनीच्या चिटणिसाची सही असावी लागते.

**६) नोंद:**

सर्व प्रकारच्या भाग प्रमाणपत्राच्या निर्गमनाची नोंद सभासदांच्या नोंदवहीत चिटणीसाच्या सहीने केली पाहिजे.

**७) प्रमाणपत्र नूतनीकरण :**

भागधारकाच्या हातून भाग प्रमाणपत्र हरविल्यास, कोणत्याही कारणामुळे ते खराब झाल्यास किंवा नष्ट झाल्यास, भागधारकाला विशिष्ट शुल्क भरून भाग प्रमाणपत्राचे नूतनीकरण करवून घेता येईल.

**८) कंपनीचा शिक्का :**

भाग प्रमाणपत्रावर कंपनीचा शिक्का असावा लागतो. त्यामध्ये भागधारकाचे नाव, पत्ते, क्रमांक भागांची संख्या इत्यादींचा उल्लेख असावा.

९) प्रमाणपत्रांचे प्रदान :

तरतुदीनुसार भागांचे वाटप केल्यापासून तीन महिन्यांच्या आत किंवा भाग हस्तांतरासाठी आल्यास त्यांची नोंद करून दोन महिन्यांच्या आत भाग प्रमाणपत्र प्रदानासाठी तयार असलीच पाहिजेत.

१०) चुका व दंड :

वर नमूद केलेल्या मुदतीत भाग प्रमाणपत्र प्रदानासाठी तयार नसल्यास कंपनीला व या त्रुटीसाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याला त्रुटीची जी मुदत असेल, त्या मुदतीमध्ये प्रत्येक दिवशी ५०० रुपये ह्या दराने दंड केला जातो.

## नकली भाग प्रमाणपत्र :

अ) ज्या विशिष्ट परिस्थितीत नकली भाग प्रमाणपत्र निर्गमित करता येते. ती परिस्थिती पुढीलप्रमाणे

१) जर मूळ प्रमाणपत्र हरवल्याचे किंवा खराब झाल्याचे सिद्ध झाले तर नकली प्रमाणपत्र मिळते.

२) जर मूळ प्रमाणपत्र जुने झाले असेल किंवा फाटले असेल तर नकली प्रमाणपत्र मिळते.

३) जर भागांचे एकीकरण किंवा उपविभाजन झाले तर देता येते.

४) हस्तांतरणाच्या नोंदणीकरिता त्याचा परताव्याच्या स्वरूपात वापर झाला असेल तर,

ब) नकली भागप्रमाणपत्र/दुसरी प्रत देण्याची कार्यपद्धती

१) मूळ प्रमाणपत्र अस्तित्वात असताना :

दुसरी प्रत मिळविण्यासाठी भागधारकाला कंपनीकडे विनंती अर्ज करावा लागतो. अर्जासोबत मूळ दाखला व नियमावलीत दर्शविलेले शुल्क (जास्तीत जास्त २ रु.) द्यावे लागते. भागधारकाने विनंती अर्ज मूळ भाग दाखला व योग्य शुल्क कंपनीकडे भरल्यास भागधारकास कंपनीकडून त्याबदल्यात पावती दिली जाते. त्यानंतर चिटणीस भागधारकांचा विनंती अर्ज योग्य प्रकारे तपासतो आणि तद्नंतर संचालक मंडळापुढे विचारार्थ ठेवतो. संचालक मंडळ आपल्या ठराव संमत करून दुसरी प्रत देण्यास मान्यता देतात. त्यानंतर कंपनी चिटणीस मूळ भाग दाखल्यावर रद्द केलेला असा शेरा मारतो व भाग दाखल्याची दुसरी प्रत तयार करतो त्यावर कंपनीची मुद्रा उमटवितो व दोन संचालकांच्या सह्या घेतो व त्यानंतर ही दुसरी प्रत भागधारकास घेऊन जाण्यास सुचवितो. कंपनी चिटणीस पावती बदल्यात नवीन भाग दाखला किंवा भाग दाखल्याची दुसरी प्रत सभासदाला देतो.

२) मूळ प्रमाणपत्र अस्तित्वात नसताना :

त्यासंबंधीची पद्धत खालीलप्रमाणे आहे.

i)भागधारकाला प्रथम दुसरी प्रत मिळविण्यासाठी कंपनीकडे विनंती अर्ज करावा लागतो.

ii)अर्जासोबत दुसरे भाग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्याला नियमावलीने ठरविल्याप्रमाणे किंवा जास्तीत जास्त २ रु. शुल्क भरावे लागते.

ii) भागधारकाने शपथ अधिकाऱ्यापुढे जाऊन भाग प्रमाणपत्र हरविल्याची शपथ घेणे व अधिकाऱ्याने त्याच्या उपस्थितीत शपथ घेतल्यासंबंधी सही करणे.

iv)अर्जासोबत मूळ भाग दाखल्याच्या दुरुपयोगामुळे कंपनीचे नुकसान झाल्यास ते भरून देण्याची हमी देणारे हमी पत्र भागधारकाला कंपनीच्या नावाने द्यावे लागते.

v) जर धोका मोठ्या प्रमाणावर असेल म्हणजेच मूळ भाग प्रमाणपत्रातील रक्कम किंवा भागांची संख्या जास्त असेल तर हमीपत्राशिवाय भागधारकाला बँकेची हमी (हमीपत्र) द्यावी लागते.

vi) संचालक मंडळाचा ठराव घेणे.

vii)चिटणीस त्यानंतर नवीन भाग दाखले तयार करतो. त्यावर कंपनीची मुद्रा उमटवितो व दोन संचालकांच्या सह्या घेतो. या दाखल्यावर दुसरी प्रत असे ठळकपणे लिहितो.

ix) चिटणीस संबंधित भागधारकांना भाग दाखले घेऊन जाण्याची सूचना देतो व भाग दाखला दिल्यानंतर सभासदांच्या नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी करतो.

भाग दाखल्याची खोटी किंवा बनावट दुसरी प्रत दिल्यास कंपनीला व संबंधित अधिकाऱ्याला १० हजार रुपयांपर्यंत दंड व ६ महिन्यांपर्यंत सक्तमजुरी अशी शिक्षा होऊ शकते.

---

**संदर्भ ग्रंथ -**


- कंपनी कायद्याचे घटक -I -डॉ. गोविंद डुंबरे ,डॉ. शिवाजी टाकळकर ,डॉ. आशा कदम-पेंढारी
- कंपनी कायद्याची मुलतत्वे – प्रा. सुरेश भिरूड आणि इतर
- कंपनी कायद्याची मुलतत्वे(भाग १) – डॉ. धीरज झाल्टे आणि इतर
- Elements of Company Law - Sultan Chand & Sons
- Elements of Company Law - N.D.Kapoor
- Elements Of Company Law- Prof.Prakash N. Chaudhary